## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०१/२०१७

**१) मोटार सायकलच्या धडकेत तीन जखमी . :–**

दिनांक १५/०१/२०१७ चे १५.१५ वा. दर. यातील फिर्यादी रवींद्र बाबुराव लांजेवार वय ३२ वर्ष रा. वडेगाव खांबा हा आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु ६४३९ ने पत्नी, मुलगा व साळी सोबत दुर्गाबाई डोहाकडे जत्रेवर जात असता यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल ने दुर्गाबाईचे डोहा वरुन साकोली कडे येत असतांना आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारुन फिर्यादीस व त्याची पत्नी रत्नमाला वय २५ वर्ष व मुलगा कुंदन वय ७ वर्ष व साळी आरती सोंवीदा बोरकर वय २२ वर्ष रा. पाथरी यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमी हे उप जिल्हा रुग्नालय साकोली येथे उपचार घेत असुन त्यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) विषारी औषधप्राशन केल्याने उपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु. :–**

दिंनाक १४/०१/२०१७ चे २१.३५ वा. दर. यातील मृतक सुभम ज्ञानेश्वर कापगते वय २० वर्ष, रा. बोधरा याने ओपी पॉयझनींग प्राषण केल्याने औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टे साकोली येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. मडावी याचे रिपोर्ट वरुन पोस्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद केला. पुढील तपास पोहवा. सिंदीमेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १५/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती १३ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६२ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.